महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

**पार्श्वनाथ ९ इमारत, बिडको नाका,** **दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११**

**नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर** **Email ID : collectorpalghar@gmail.com**

---

**वाचले:-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २५

२) साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसुचना क्र/करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२० नुसार महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२०.

४) मा.सचिव (गृह), गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील अधिसुचना क्र.४०-३/२०२०-डीएम-आय (ए) दि.२४/०३/२०२०.

५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना क्रमांक - No:DMU/ २०२०/ CR.९२/DisM-१/दि.२३.०३.२०२०, दि.२४.३.२०२० व दि.२५.३.२०२०.

---

क्र.जि.आ.व्य.पालघर/कोरोनाविषाणू/वर्तमानपत्रविक्री/आदेश/कावि- ३६७ /२० दि.३१/०३/२०२०

जिल्हाधिकारी पालघर

**आ दे श**

ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.३ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली असून शासन अधिसूचनेच्या नियम १० नुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे

ज्याअर्थी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणे व या संदर्भात तातडीच्या उपाययोजना करण्यासाठी व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य स्तरावर कोरोना नियंत्रण कक्ष व जिल्हा स्तरावर जिल्हा सनियंत्रण कक्ष स्थापित करण्यात आले आहेत. कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपोद्घातातील अ.क्र.४ व ५ च्या अधिसुचनेद्वारे राज्यामध्ये लॉकडाऊन परिस्थिती लागू करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांना उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष घोषित करण्यात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी वृत्तपत्र सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने वृत्तपत्र एजन्सी व इतर वृत्तपत्र सेवा पुरविणाऱ्या संस्था यांना वृत्तपत्र वितरण व विक्री करीता तसेच वृत्तपत्र घरपोच सेवा देण्यासाठी परवानगी देणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, मी **डॉ.कैलास बा. शिंदे, जिल्हाधिकारी पालघर,** मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २५ व उपोद्घातातील अ.क्र.३ अन्वये शासन अधिसुचनेनुसार मला पालघर जिल्हयाच्या